अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला -४४४१०४

डॉ.बी.व्ही. सावजी
अधिष्ठाता

ई-मेल-adlae@pdkv.ac.in

क्रं. अ./ निकृशि/ प्रवेश/556 /२०२० दिनांक - 01 / 12 /२०२०

**परिपत्रक**

**विषय- निम्न कृषि शिक्षण अंतर्गत कृषि विज्ञान पदविका (ग्रामीण शिक्षण संस्था) अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०२०-२०२१ चे केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया व सुधारित वेळापत्रकाबाबत.**

**संदर्भ -**
**१) मकृप १५१४/ प्र.क्र. १०० (भाग-१)/७- अे दिनांक -२६ नोव्हेंबर , २०२०**
**२) परिपत्रक मकृप /शिक्षण-१/२२२०/२०२० दिनांक -२६ नोव्हेंबर , २०२०**
**३) परिपत्रक मकृप /शिक्षण-१/११२०/२०२१ दिनांक -२६ नोव्हेंबर ,२०२०**

निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला अंतर्गत द्विवर्षीय कृषि विज्ञान पदविका (ग्रामीण शिक्षण संस्था) अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक सत्र २०२०-२१ करिता केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया १७/०८/२०२० पासून सुरू करण्यात आलेली होती. कृषि व पदुम विभागाच्या शासन परिपत्रकास अनुसरून सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरिता (SEBC) उक्त प्रवेश प्रक्रियेमधे आरक्षित करण्यात आलेल्या १२ टक्के जागेसंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/०९/२०२० रोजी अंतरिम स्थगिती दिल्याने, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे कार्यालयाच्या परिपत्रकान्वये सदर प्रवेशप्रक्रियेस तात्पुरत्या स्वरूपास स्थगिती देण्यात आलेली होती.

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे कार्यालयाच्या दि. २६ नोव्हेंबर २०२० च्या सुधारित परिपत्रकान्वये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडून कृषि व संलग्न विद्याशाखेची पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरू करनेविषयी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक निश्चिती जाहीर करून कार्यवाही चालू ठेवण्याचे जाहीर केलेले आहे.

त्यास अनुसरून विद्यापीठ अंतर्गत प्राचार्य, ग्रामीण शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे कार्यालयाच्या परिपत्रकाप्रमाणे निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला अंतर्गत द्विवर्षीय कृषि विज्ञान पदविका (ग्रामीण शिक्षण संस्था) अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक सत्र २०२०-२१ ची स्थगित असलेली प्रवेश प्रक्रिया सुधारित वेळापत्रकानुसार पुनः चालू करण्यात येत आहे.

सहपत्र : सुधारित वेळापत्रक

अधिष्ठाता
निम्न कृषि शिक्षण
डॉ. पं. दे. कृ. वि.,अकोला